# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली, दिनांक ०१/०५/२०१७

## पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे महाराष्ट्रदिन उत्साहात साजरा

*पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्राप्त जवानांना सन्मानचिन्ह प्रदान व सत्कार*

पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे मा. आदिवासी विकास राज्यमंत्री म.रा. तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा, श्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन ५७ वा महाराष्ट्र वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पोलीस कवायत मैदानावर उत्कृष्ट पदसंचलन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रंजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

गडचिरोली जिल्हयात अति दुर्गम भागात काम करुन जनतेची सेवा तसेच समाजकंठक नक्षलवादयांशी लढा देऊन आपल्या प्राणाची पर्वा न करता मोठया धैर्याने कर्तव्य बजावणा-या आणि उल्लेखनिय कामगिरी करणा-या गडचिरोली जिल्हयाच्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी असे एकूण ८७ जणांना पोलीस महासंचालक पदक जाहीर झाले आहे. शौर्य पदक प्राप्त ०७ पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच ०२ उपविभागीय पोलीस अधिकारी, ०१ पोलीस निरीक्षक, ०३ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ०९ पोलीस उपनिरीक्षक, ६५ पोलीस कर्मचारी यांना पोलीस महासंचालक पदक महाराष्ट्र दिनाच्या निमीत्याने पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथील मुख्य कार्यक्रमामध्ये मा. श्री. राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या हस्ते प्रदान करुन त्यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी सदर कार्यक्रमाला मा. जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता भांडेकर, नगर परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता पिपरे, मा. जिल्हाधिकारी श्री. ए. एस. आर. नायक, मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, मा. मुख्यकार्यकारी अधिकारी गडचिरोली, श्री. शांतनु

गोयल, मा. सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. बिपीन इटनकर तसेच लोकप्रतिनीधी व अधिकारी / कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.




